ल पा तलाव चिंचाटी लोहारा, ता.रावेर,
जि.जळगाव, या योजनेस द्वितीय सुधारित
प्रशासकिय मान्यता प्रदान करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांकः सुप्रमा -२०१९/(८७ /२०१९) लपा
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक:- २१ सप्टेंबर, २०१९.

<u>पहावे:</u>

१) कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांचे पत्र क्र.जा.क्र. तापाविम/प्रशा-५/५७८/सन-२०१९, दि.२५/०१/२०१९

२) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचे पत्र क्रमांक व्यअस-२०१९/प्र.क्र.४१/अर्थसं-२, दिनांक २१/०९/२०१९

<u>प्रस्तावना :</u>

ल पा तलाव चिंचाटी लोहारा, ता.रावेर, जि.जळगाव, या योजनेस शासन निर्णय क्र.लपायो-१०९५/३२/९५/जल-१,जलसंधारण,दि.२९/०२/१९९६ अन्वये एकुण रू.१.५५ कोटी (दरसूची सन१९९५-९६) या किंमतीस मूळ प्रशासकीय मान्यता आहे. तसेच तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांचे निर्णय क्र.तापाविम/कासं/प्रवि-१/नविन प्रमा/१३/९९, दि.०१/०९/१९९९, अन्वये एकूण रु.२.६९ कोटी (दरसूची सन १९९८-१९९९) नुसार नव्याने प्रशासकीय मान्यता किंमतीस प्रदान करण्यात आली आहे. तसेच तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांचे निर्णय क्र.तापाविम/कासं/प्रशा-१/सुप्रमा/लपायो-७४, दि.१२/१२/२००६ अन्वये एकूण रु.४.९८ कोटी (दरसूची सन २००५-०६) नुसार या किंमतीस प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

सदर प्रकल्पाचे काम सुरु असतांना दरसूची दरातील वाढ, भूसंपादनाच्या किंमतीतील वाढ, अपुऱ्या तरतूदीमुळे झालेली वाढ, नविन तरतूदीमुळे झालेली वाढ, इतर कारणांमुळे झालेली वाढ व अनुषंगिक खर्चातील वाढ या कारणांमुळे वाढ होत असल्यामुळे या योजनेस द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करणे आवश्यक झाले आहे. तरी याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय:

संदर्भ क्र.१ च्या पत्रान्वये तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांनी सादर केलेल्या ल.पा.तलाव चिंचाटी लोहारा, ता.रावेर, जि.जळगाव, या योजनेस सन २०१७-१८ च्या दरसूचीवर आधारित एकूण रुपये १७.८७ कोटी (अक्षरी रुपये सतरा कोटी सत्त्याऐंशी लाख फक्त) या किंमतीस द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. उपशिर्षवार तरतुदींचा गोषवारा सोबतच्या परिशिष्टामध्ये जोडला आहे.

२. सदर द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

२.१) लगतपूर्व प्रशासकीय मान्यता प्राप्त किंमतीपेक्षा अधिक खर्च शासन मान्यतेविना केला असल्यास प्रथमत: जबाबदारी निश्चित करुन खर्च नियमित करण्याची कार्यवाही करावी.

२.२) प्रकल्पाची अंमलबजावणी करतांना प्रचलित शासन निर्णय,नियम, CVC तत्वे, वित्तीय मर्यादा, विहित निविदा कार्यपद्धती अनुसरणे याचे अनुपालन करावे.

२.३) या प्रकल्पासंदर्भात आधीच्या कालावधीत कोणतीही आर्थिक वा कार्यपध्दतीत अनियमितता झाली असल्यास ती या मान्यतेने नियमित झाली असे म्हणता येणार नाही.

२.४) सदर सुधारित प्रशासकीय मान्यतेमुळे अहवालातील तांत्रिक बाबी, निविदा विषयक क्षेत्रिय निर्णय किंवा अनियमितता या निर्णयाव्दारे नियमित केल्या आहेत, असे नव्हे.

२.५) सदर योजनेसाठी कोणत्याही प्रयोजनार्थ मंजूर प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेबाहेर जाऊन, अतिरिक्त खर्च करता येणार नाही.

२.६) या योजनेबाबत चालू असलेल्या अथवा प्रस्तावित विभागीय चौकशीची कार्यवाही पुढे चालू राहील. सदर सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याच्या निर्णयामुळे विभागीय चौकशीच्या कार्यवाहीस कोणतीही बाधा पोहचणार नाही.

३. या योजनेच्या कामावरील खर्च मागणी क्र.आय-५ प्रधान लेखाशिर्ष, "४७०२लहान पाटबंधाऱ्यावरील भांडवली खर्च, (८०) सर्वसाधारण, (१९०) सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमांना गुंतवणूका(००), (००)(०३) तापी पाटबंधारे विकास महामंडळास भागभांडवली अंशदान, (लहान पाटबंधारे) (कार्यक्रम),५४-गुंतवणुका (४७०२ ४९२७)" या लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा व शासनाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय, नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.६०/का.१४३४ दि.२३/०५/२०१९ आणि वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.१३६/व्यय १२ दि.०२/०८/२०१९ अन्वये तसेच व्यय अग्रक्रम समीतीने दि.०३/०९/२०१९ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत दिलेल्या मंजूरीनुसार व संदर्भ क्र.२ नुसार याबाबतच्या निर्गमीत केलेल्या इतिवृत्तानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. या योजनेस प्रदान करण्यात आलेली द्वितीय सुधारित प्रशासकिय मान्यता प्रशासकीय मान्यतेच्या नोंदवहीमध्ये (२००/२०१९) अनुक्रमांकावर नोंदण्यात आली आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९२११८०१४०२७२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dharane Mallikarjun Irappa

Digitally signed by Dharane Mallikarjun Irappa
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=42153c779eba7d6ca17364b6d37857b105b20a01d36c767c7ed1d7d278837bd7, serialNumber=8a9bdce987e31fe4e079969a0eb71bce94df0f9984bd752cc203bcd86349bbb5, cn=Dharane Mallikarjun Irappa
Date: 2019.09.23 17:50:10 +05'30'

(म.ई.धरणे)
उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.
३. सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य., मुंबई.
४. विरोधी पक्ष नेते विधान परिषद / विधानसभा.
५. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर.
६. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर.
७. वित्त विभाग (व्यय-१२), मंत्रालय, मुंबई ३२
८. नियोजन विभाग (कार्यासन १४३४), मंत्रालय, मुंबई ३२.
९. कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ,जळगाव
१०. मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ,जळगाव.
११. आंतर वित्त सल्लागार व उप सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. जिल्हाधिकारी, जळगाव.
१३. अधीक्षक अभियंता, जळगाव पाटबंधारे प्रकल्प मंडळ,जळगाव.
१४. अर्थशाखा १/२ (२ प्रती), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
१६. लपा कार्यासन संग्रहार्थ.

<u>परिशिष्ट</u>

सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्तावित किंमतीचा उपशीर्षनिहाय तरतुदीचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे

ल पा तलाव चिंचाटी लोहारा, ता.यावल, जि.जळगाव,

शासन निर्णय क्रमांक :- सुप्रमा -२०१९/(८७/२०१९) लपा, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक:- २१ सप्टेंबर, २०१९

(रु. कोटी)

अ.क्र.	तपशिल	द्वितीय सुधारित प्रशासकिय मान्यतेनुसार तरतुद (दरसूची सन २०१७-१८)
१	अ- प्राथमिक	०.०१
२	ब- भूसंपादन	४.४९
३	क- कामे	११.८८
४	डी- विमोचक	०.१८
५	के- इमारती	०.००
६	ओ- संकिर्ण	०.०१
७	पी- देखभाल	०.०३
८	आर- दळणवळण	०.०१
	अनुषंगिक खर्च	१.२६
	एकूण रुपये	**१७.८७**